ePaper

## इराणचा अमेरिकेला मोठा इशारा; प्रमुख ठिकाणांना टार्गेट



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 02 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक कोंडी

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते पुण्यात पुरस्कार प्रदान

# अजित डोवाल यांना 'लोकमान्य टिळक पुरस्कार'






महाईन्यूज । पुणे

जंतर-मंतर येथील तरुण आणि विद्यार्थ्यांच्या जोरदार आंदोलनानंतर राजकीय वातावरण तापले असताना, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यातील कार्यक्रमात या वादावर कोणतेही भाष्य करणे टाळले. पुण्यात आयोजित विशेष सोहळ्यात भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (NSA) अजित डोवाल यांना अमित शाह यांच्या हस्ते 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना अमित शाह यांनी लोकमान्य टिळकांच्या विचारांचा वारसा सांगत देशभरातील तरुणांना टिळकांनी लिहिलेला 'गीतारहस्य' हा ग्रंथ वाचण्याचे आवाहन केले.

### अजित डोवाल यांचा सन्मान

NSA अजित डोवाल यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या नागरिकांना आणि तरुणांना देशासाठी काम करण्याची मोठी प्रेरणा मिळेल, असे अमित शाह म्हणाले. एखादी व्यक्ती जेव्हा समाजासाठी आणि देशासाठी असामान्य योगदान देते, तेव्हा ती केवळ एक व्यक्ती राहत नाही. अशा व्यक्तीचा सन्मान करणे म्हणजे समाजातील कृतज्ञता व्यक्त करणे होय, असे सांगत त्यांनी टिळक स्मारक ट्रस्टचे आभार मानले.

### गीतारहस्य वाचा; अमित शाह

अमित शाह यांनी आपल्या भाषणात लोकमान्य टिळकांच्या विचारधारेवर आणि 'गीतारहस्य' ग्रंथावर भर दिला. ते म्हणाले, "मला लोकमान्य टिळकांचा 'गीतारहस्य' हा ग्रंथ गुजरातीत वाचायला मिळाला. हा ग्रंथ म्हणजे भगवद्गीतेचे व्यवहारिक स्वरूप आहे. सामान्य माणसाने गीतेतील विचार दैनंदिन आयुष्यात कसे जगावेत, याचे उत्तम मार्गदर्शन यात आहे. माझे देशभरातील तरुणांना आवाहन आहे की तुम्ही टिळकांचे 'गीतारहस्य' नक्की वाचा. हे वाचल्यानंतर तुम्ही आयुष्यात कधीही चूक करणार नाही, याची मी गॅरंटी देतो," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### केसरी-मराठा आणि राष्ट्राची चेतना

इंग्रज सरकार ज्या वृत्तपत्रांना सर्वात जास्त घाबरायचे, ती म्हणजे 'केसरी' आणि 'मराठा'. या वृत्तपत्रांच्या माध्यमातून लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्याची मशाल पेटवली. राष्ट्राची चेतना जागवल्याशिवाय मिळालेल्या स्वातंत्र्याला अर्थ नाही, असे टिळकांचे ठाम मत होते. त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंतीसारख्या उत्सवांच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणण्याचे ऐतिहासिक काम केले, असे शाह म्हणाले.



# गांजातस्करांशी संगनमत सिद्ध

## मोबाईल संपर्क, आर्थिक व्यवहारांच्या पुराव्यांवरून कारवाई; विभागीय चौकशीत आरोप सिद्ध

**महाईन्यूज । पुणे**

**गांजातस्करांशी संगनमत ठेवून त्यांच्याकडून आर्थिक लाभ घेतल्याचा ठपका सिद्ध झाल्याने स्वारगेट पोलिस ठाण्यातील पोलिस शिपाई नवनाथ कांताराम शिंदे याला अखेर शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. विभागीय चौकशी, साक्षीपुरावे आणि मोबाईल संपर्काच्या आधारे आरोप पूर्णपणे सिद्ध झाल्याचा निष्कर्ष नोंदवत अपर पोलिस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) राजेश बनसोडे यांनी हे आदेश दिले आहेत.**




स्वारगेट पोलिस ठाण्यात कार्यरत असताना शिंदेने सहकारनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गांजा विक्रेत्यांशी सातत्याने संपर्क ठेवला, त्यांना अवैध व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी अप्रत्यक्ष मदत केली आणि त्यातून आर्थिक लाभ मिळविल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला होता. याप्रकरणी प्राथमिक चौकशी, त्यानंतर विभागीय चौकशी करण्यात आली.

चौकशीदरम्यान सरकारी साक्षीदारांचे जबाब, मोबाईल संपर्काचे तांत्रिक पुरावे आणि इतर कागदपत्रांवरून सर्व आरोप सिद्ध झाल्याचे चौकशी अधिकाऱ्यांनी नमूद केले. चौकशीत गांजातस्कराच्या मोबाईलमध्ये शिंदेचा क्रमांक व मागील दोन वर्षांपासून दोघांमध्ये सातत्याने संपर्क असल्याचे तसेच तस्करांकडून नियमित आर्थिक व्यवहार होत असल्याचे निष्पन्न झाले. वरिष्ठांनी अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिलेले असतानाही त्यांची पायमल्ली करून शिंदे यांनी उलट तस्करांनाच संरक्षण दिल्याचा ठपकाही ठेवण्यात आला आहे.

विभागीय चौकशी अधिकाऱ्यांनी शिंदे यांचे वर्तन संशयास्पद, बेशिस्त, बेजबाबदार आणि पोलिस दलाची प्रतिमा मलीन करणारे असल्याचा निष्कर्ष नोंदविला. त्यानंतर परिमंडल-२ च्या पोलिस उपायुक्तांनीही सर्व आरोप गंभीर असल्याचे नमूद करीत सेवेतून बडतर्फ करण्याची शिफारस केली होती. दरम्यान, कारणे दाखवा नोटीस बजावल्यानंतर शिंदे यांनी खुलासा सादर केला तसेच प्रत्यक्ष सुनावणीदरम्यान आपली बाजूही मांडली. मात्र, त्यांचा खुलासा असमाधानकारक असल्याचे नमूद करीत अपर पोलिस आयुक्त राजेश बनसोडे यांनी विभागीय चौकशीतील निष्कर्ष आणि पोलिस उपायुक्तांच्या शिफारशींशी सहमती दर्शविली.

अमली पदार्थांची तस्करी आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध पुणे पोलिसांनी कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबविली आहे.

### चौकशीत काय उघड झाले..?


- गांजातस्करांशी दोन वर्षे सातत्याने संपर्क.
- तस्कराच्या मोबाईलमध्ये शिपायाचा क्रमांक जतन.
- अवैध धंद्यास अप्रत्यक्ष संरक्षण दिल्याचा ठपका.
- तस्करांकडून नियमित आर्थिक लाभ घेतल्याचा निष्कर्ष.

गेल्या सात महिन्यांत अमली पदार्थ विक्री प्रकरणात २८३ जणांना अटक करण्यात आली आहे. अमली पदार्थांच्या विक्रीप्रकरणी शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांत १६२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# सीओईपी विद्यापीठावर विद्यार्थ्यांच्या शुल्क लुटीचा आरोप; एनएसयूआय आक्रमक

**महाईन्यूज । पुणे**

**सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ गेल्या दोन वर्षांपासून विद्यापीठ विकास निधीद्वारे विद्यार्थ्यांची लूट करत आहे. यामध्ये २०२५-२६ साली ९० हजार रुपये तर यंदाच्या वर्षी २५ हजार रुपयांचा समावेश शिक्षण शुल्क रचनेत केला असल्याचा धक्कादायक प्रकार नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया अर्थात एनएसयूआयने उघडकीस आणला आहे.**



> विद्यापीठ कायद्यानुसार शासकीय विद्यापीठांना विद्यापीठ विकास निधी घेण्याचा अधिकार आहे. गेल्या दोन वर्षांपूर्वी तो जास्त होता. तो आत्ता आम्ही कमी केला आहे. सरकार केवळ शिक्षकांचे पगार देते त्यामुळे अन्य खर्चासाठी अशा प्रकारचा निधी आम्हाला उभा करावा लागतो. सीओईपीच नाही राज्यातील अन्य सरकारी शिक्षण संस्था देखील अशा प्रकारचा निधी घेत आहेत. सरकारी विद्यापीठे चालविणे ही खरे तर सरकारची जबाबदारी आहे. परंतु, त्यांना स्वायत्तता देऊन सरकार आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करत आहे. सीओईपीकडून विद्यापीठ विकास निधीच्या माध्यमातून तब्बल ९० हजार रुपये विद्यार्थ्यांकडून घेण्यात आले आहे. ज्या शुल्काचा परतावा सरकार करते. ते शुल्क कमी आणि ज्या शुल्काचा परतावा सरकार करत नाही. ते शुल्क मोठ्या प्रमाणात आकारण्यात आले.
>
> **– डॉ. डी. एन. सोनावणे, कुलसचिव, सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ.**

सरकारी विद्यापीठे चालविणे ही सरकारची जबाबदारी आहे. परंतु, शासनाने दिलेल्या मोकळीकीचा गैरफायदा घेत सरकारी विद्यापीठे, सरकारी महाविद्यालये शुल्काद्वारे विद्यार्थ्यांची लुट करत असल्याचे उघडकीस आले आहे. ही लूट करत असताना ज्या शुल्काचा अर्थात ट्युशन फीची प्रतीपूर्ती सरकार करते. ते शुल्क कमी ठेवायचे आणि ज्या शुल्काचा परतावा सरकार करत नाही. ते शुल्क जास्त ठेवायचे असा फंडा सरकारी विद्यापीठांकडून वापरण्यात येत आहे.

सीओईपीच्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या शुल्क रचनेचा आढावा घेतला असता २०२५-२६ मधील द्वितीय वर्षाच्या शुल्कात ट्युशन फी केवळ १७ हजार रुपये घेण्यात आली. तर विद्यापीठ विकास निधी तब्बल ९१ हजार ७०० रुपये घेण्यात आला. २०२५-२६ च्या प्रथम वर्षात खुल्या प्रवर्गासाठी ट्युशन फी ७७ हजार, विद्यापीठ विकास निधी २४ हजार ६७४ आणि इतर शुल्क ४५ हजार ३० रुपये घेण्यात आले. अर्थात ६९ हजार ७०४ रुपये विद्यार्थ्यांकडून घेणे अपेक्षित नसताना देखील घेण्यात आले. तर यंदा देखील खुल्या प्रवर्गासाठी ट्युशन फी ८७ हजार, विद्यापीठ विकास निधी २५ हजार आणि इतर शुल्क ४८ हजार ३० रुपये घेण्यात आले. अर्थात 73 हजार 30 रुपये विद्यार्थ्यांकडून अपेक्षित नसताना घेण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून सक्तीने वसूल करण्यात आलेले शुल्क त्यांना परत देण्यात यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शासकीय शैक्षणिक संस्था तसेच शासकीय विद्यापीठांना इतर शुल्क किंवा विद्यापीठ विकास निधी अशा प्रकारचे शुल्क घेता येणार नसल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक कोंडी

## उत्पन्न घटल्याने विकासकामे रखडली; आता शासनाच्या अनुदानातून ५०० कोटींचे लक्ष्य

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**श्रीमंत असा नावलौकीक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक स्थिती सध्या डबघाईस आली आहे. त्यामुळे खर्चावर मर्यादा आल्या आहेत. मोठी विकासकामे निधीअभावी रखडली आहेत. त्यामुळे महापालिकेने आता केंद्र व राज्य शासनाच्या वेगवेगळे विभाग, प्रकल्प, योजना, अभियान, उपक्रमात वितरीत केल्या जाणाऱ्या अनुदानाच्या निधीवर लक्ष केंद्रित केले आहे.**

त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार असून, दरवर्षी किमान 500 कोटी रुपयांचा निधी जमा करण्याचे टार्गेट खासगी एजन्सीला देण्यात येणार आहे. महापालिकेचे सन 2026-27 या वर्षांचा मूळ अर्थसंकल्प 5 हजार 660 कोटी 72 लाख रुपयांचा आहे. तर, केंद्र व राज्य शासनाचा निधी धरून अर्थसंकल्प एकूण 9 हजार 322 कोटी 17 लाख रुपयांचा आहे. सन 2025-26 या आर्थिक वर्षात महापालिकेचे उत्पन्न 2 हजार 93 कोटी 12 लाख रुपयांनी घटले होते. महापालिकेने वर्षभरात 6 हजार 252 कोटी रुपयांचे टार्गेट ठेवले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ 4 हजार 158 कोटी 88 लाख रुपयाचे उत्पन्न वर्षभरात महापालिका तिजोरीत जमा झाले आहे. घटलेले उत्पन्न अणि पुढील चार वर्षांची देणी (दायित्व) लक्षात घेता महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक आहे.

नवीन मोठे व खर्चिक प्रकल्प राबवण्यास महापालिकेकडे निधीची चणचण भासत आहे. त्यासाठी कर्ज तसेच, म्युन्सिपल बॉण्ड काढण्याचा पर्यायांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्याद्वारे निधी उभारून प्रकल्प राबवण्याची वेळ महापालिकेवर आली आहे. या आर्थिक परिस्थितीवर मात करण्यासाठी महापालिका प्रशासनाने केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारे विविध प्रकाराचे अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. केंद्र व राज्य शासनाकडून वेगवेगळे विभाग, प्रकल्प, योजना, अभियान, उपक्रमासाठी दरवर्षी अनुदान वितरीत केले जाते. त्यासाठी खासगी एजन्सी नेमण्यात येणार आहे. त्या एजन्सीला वर्षभरात 500 कोटी रुपयांचे अनुदान जमा करण्याचे टार्गेट असणार आहे. टार्गेट पूर्ण करणाऱ्या एजन्सीला हे काम दिले जाणार आहे. त्या दृष्टीने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.




### आर्थिक सक्षम असल्याने पूर्वी अनुदानाकडे दुर्लक्ष

पिंपरी-चिंचवड महापालिका पूर्वी आर्थिक सक्षम होती. खर्चाचा सपाटा लावत, मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली गेली. विशेषत: प्रशासकीय राजवटीच्या चार वर्षाच्या काळात मोठ्या प्रमाणात उधळपट्टी करण्यात आली. तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिकेच्या इतिहासात खर्चाचे अनेक विक्रम मोडले. नाहक उधळपट्टी थांबविण्याच्या लेखा व वित्त विभागाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करत त्यांनी वारेमाप खर्चाचा सिलसिला कायम ठेवला. महापालिका आर्थिक सक्षम असल्याने केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाकडे लक्ष दिले गेले नाही. त्यासाठी पाठपुरावाही केला गेला नाही. परिणामी, पाणीपुरवठा, पर्यावरण, ड्रेनेज, वैद्यकीय, शहरी दळणवळण, महिला बालकल्याण आदी विभागाचे अनुदान महापालिकेस प्राप्त झालेले नाही. आता, शासनाच्या अनुदानासाठी प्रशासन गंभीर झाले असून, तो निधी मिळविण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात आली आहे.

### शासनाचे अनुदान मिळविण्यास प्राधान्य

केंद्र व राज्य शासनाकडून वेगवेगळ्या प्रकाराचे अनुदान मिळते. ते प्राप्त करण्यासाठी महापालिकेकडून संस्था नियुक्त केली जाणार आहे. ती संस्था महापालिकेस दरवर्षी 500 कोटी रुपयांचे अनुदान निधी मिळवून देणार आहे. त्याद्वारे महापालिका उत्पन्नात भर पडणार आहे, असे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये उघड्यावर स्क्रॅप वाहतूक; अपघाताचा धोका वाढला

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडच्या उद्योगनगरीत औद्योगिक भंगार व धातूचा कचरा उघड्यावर वाहून नेण्याचे प्रकार सर्रास सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. शहरातील प्रमुख रस्ते व उड्डाणपूल मार्गावर एका ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात धातूचे स्क्रॅप कोणतेही ताडपत्री किंवा सुरक्षात्मक जाळी न लावता वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.**



अशा प्रकारच्या निष्काळजी वाहतुकीमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, अपघाताचा धोका वाढला आहे. औद्योगिक स्क्रॅप, लोखंडी तुकडे किंवा इतर भंगार साहित्य ट्रकमधून वाहतूक करताना ते व्यवस्थित झाकणे आणि सुरक्षितपणे बांधणे अपेक्षित असते.

मात्र अनेक वाहनांमध्ये हे नियम पाळले जात नसल्याचे दिसून येते. वाहन चालू असताना लहान-मोठे तुकडे रस्त्यावर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मागून येणाऱ्या दुचाकीस्वार, चारचाकी वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

याशिवाय उघड्यावर वाहतूक केल्यामुळे धूळ, कचरा आणि सूक्ष्म धातूचे कण हवेत पसरतात. याचा परिणाम पर्यावरणासह नागरिकांच्या आरोग्यावरही होऊ शकतो. शहरातील औद्योगिक क्षेत्रात अशा वाहनांची नियमित तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

यासोबतच अशा निष्काळजी वाहतुकीमुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता वाढते आणि नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागतो. संबंधित वाहनचालक आणि वाहतूकदारांनी सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करणे ही त्यांची जबाबदारी आहे. वाहतूक विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) आणि स्थानिक प्रशासनाने अशा वाहनांवर विशेष मोहीम राबवून तपासणी करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केल्यास अशा प्रकारांना निश्चितच आळा बसू शकतो. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सुरक्षित आणि नियमबद्ध मालवाहतुकीची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज बनली आहे.

> उघड्यावर औद्योगिक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांवर विशेष मोहीम राबवावी. सर्व स्क्रॅप वाहतूक करणाऱ्या वाहनांना ताडपत्री किंवा सुरक्षात्मक जाळी बंधनकारक करावी. ओव्हरलोड व असुरक्षित वाहतुकीवर दंडात्मक कारवाई करावी. औद्योगिक कंपन्यांना सुरक्षित वाहतुकीबाबत सक्त सूचना द्याव्यात. भंगार किंवा स्क्रॅपची वाहतूक करताना सुरक्षितता नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे,हवेत उडनारे कण डोळ्यात गेल्यास गंभीर इजा होउ शकते. उघड्यावर किंवा ओव्हरलोड वाहतूक केल्यास अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. अशा वाहनांवर प्रशासनाकडून नियमित कारवाई करणे गरजेचे आहे. शहर वाहतूक विभागानेही याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
>
> – **जितेंद्र मोरे, दुचाकीस्वार.**



## भूमिका

**अमेरिका समस्यांचा चक्रव्यूह निर्माण करते आणि भारत तो चक्रव्यूह भेदून आर्थिक महासत्तेकडे समर्थपणे वाटचाल करू लागतो. याचा प्रत्यय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड दौऱ्यातून जसा आला तसा जयशंकर यांच्या आखाती देशांच्या दौऱ्यातून सुद्धा प्रकट झाला आहे.**

# ऊर्जा कोंडी सोडविणारा आखाती दौरा



आखातामध्ये युद्धाचे ढग असताना भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी सहा आखाती देशांचा दौरा केला. त्यापैकी त्यांनी भेट दिलेल्या चार देशांचा दौरा हा अत्यंत महत्त्वाचा असून भारतातील ऊर्जा कोंडी सोडविणारा सकारात्मक दौरा असेच त्याचे वर्णन करावे लागेल.

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी आखाती युद्धातील ताण-तणाव आणि ऊर्जा कोंडी सोडविण्यासाठी करावयाच्या प्रयत्नासंदर्भात कतार तसेच बहरीन, कुवेत आणि ओमान या चार देशांचा दौरा केला. या दौऱ्यामुळे पश्चिम आशियातील युद्ध आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांनी ऊर्जा सुरक्षा तसेच अमेरिका-इराण यांच्यातील तह, आखातातील स्थैर्य आणि परदेशस्थ भारतीयांचे कल्याण यावर त्यांनी मुख्य लक्ष केंद्रित केले होते. या देशांशी असलेले भारताचे मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ करण्यासाठी आणि ऊर्जा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्याबरोबर आर्थिक व सामाजिक भागीदारी दृढ करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले टाकण्यात आली आहेत.

त्यांच्या या दौऱ्याची मुख्य फलश्रुती काय असेल तर भारतासमोरील ऊर्जा संकट सोडविण्यासाठी त्यांनी या देशांकडून मिळविलेली आश्वासने आणि निश्चित सहाय्य योजनांना अंतिम रूप देण्यात त्यांना आलेले यश असे म्हणता येईल. या चार देशांच्या भेटीदरम्यान काही प्रमुख निष्कर्ष आणि फलश्रुतींचा तपशील हाती आला आहे तो येथे थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडला आहे.

आखातामधील प्रमुख देशांच्या नेतृत्वासोबत भारत दीर्घकालीन सुसंवाद साधत आहे. हा सुसंवाद ऊर्जापुरवठा सुरक्षित करणे या मुद्यावर जसा भर देणारा आहे तसाच तो आर्थिक गुंतवणूक अधिक वाढविणे आणि विकास योजनांना पूरक गती देणे यावर प्रामुख्याने द्विपक्षीय चर्चा केंद्रित झालेली होती. आखाती युद्धाचा सर्वात मोठा परिणाम भारताच्या वेगवान आणि गतिमान अर्थव्यवस्थेवर होत आहे. तो कमी करण्यासाठी आणि आपल्या नागरिकांचे हितसंवर्धन करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी टाकलेल्या दमदार पावलामुळे भारतीय नागरिकांना ऊर्जा संकट जाणवले नाही. तथापि आखातामधील तणाव अजून निवळत नाही तोपर्यंत काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी आखातामधून भारताला होणारा पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी पुरवठा सुरळीत करण्यासाठी ठोस प्रयत्न केले आहेत. युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कटली होती. आता या पुरवठा साखळीचे चक्र पुन्हा गतिमान करण्यासाठी आणि पुरवठा साखळीत भक्कम संरक्षण देण्यासाठी जयशंकर यांनी प्रयत्न केले आहेत. या दृष्टीने ऊर्जा संकट सौम्य करण्यात तसेच आर्थिक आणि व्यापारी संबंध दृढ करण्यात त्यांना निश्चितपणे यश आले आहे.

## प्रासंगिक »

### पश्चाताप

**एकदा एक कोल्हा भुकेने व्याकुळ होऊन अन्नासाठी भटकत होता. तेवढ्यात त्याला एक मोठ्ठा आवाज ऐकू आला. त्या आवाजाने कोल्हा घाबरला.**

पण तो आवाज कोणता प्राणी काढतोय हे जाणून घेण्याची उत्सुकता त्याला स्वस्थ बसू देईना. तो त्या आवाजाच्या दिशेने निघाला. शोधता शोधता त्या आवाजापर्यंत गेला, तेव्हा त्याच्या नजरेला एक नगारा दिसला.

त्यावर एका झाडाची फांदी वाऱ्याने आपटत होती. म्हणून तो आवाज निघत होता. हे पाहून कोल्हा त्या नगाऱ्यावर चढला व त्यावर पाय आपटू लागला. थोड्या वेळाने त्याला वाटले की, हे कातडे जर ओरबाडून काढले, तर आत खूप मांस मिळेल, दोन दिवसांची भूक भागेल.

तो कातडे कुरतडू लागला. त्याच्या दाढा दुखू लागल्या आणि कातडे फाटले, तेव्हा त्याला मांस न दिसल्याने तो दुःखी झाला. त्याला वाईट वाटले.

- तात्पर्य : **जो माणूस मागचा-पुढचा विचार करून वागतो, त्यावर पश्चाताप करण्याची वेळ येत नाही. अविचाराने कोणतीही गोष्ट केली की, वाट्याला दुःखच येते.**

धर्मेंद्र प्रधान यांचा केंद्रीय शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा हा केवळ एका मंत्र्याचा पदत्याग नसून देशातील विद्यार्थ्यांच्या आवाजाची ताकद दाखवणारी महत्त्वाची घटना आहे.

# खरी परीक्षा आता शिक्षण व्यवस्थेची!'




परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकार, पेपरफुटी आणि राष्ट्रीय चाचणी संस्थेवरील प्रश्नांमुळे निर्माण झालेल्या तीव्र असंतोषानंतर सरकारला जबाबदारी स्वीकारावी लागली. त्यामुळे हा राजीनामा प्रशासकीय फेरबदल नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाचे उदाहरण ठरला आहे.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळू शकत नाही; मात्र यानंतर सरकार आणि शिक्षण मंत्रालय अधिक सजग होईल, अशी अपेक्षा आहे. फक्त मंत्री बदलून प्रश्न सुटणार नाहीत. परीक्षा व्यवस्थेत रुजलेले भ्रष्टाचाराचे जाळे, पेपरफुटीत सहभागी असलेले दलाल, लाखो रुपयांच्या मोबदल्यात यशाची हमी देणारे काही क्लास व अकॅडमी चालक आणि निष्काळजी अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई होणे तितकेच आवश्यक आहे.

परीक्षा ही विद्यार्थ्यांसाठी केवळ सरकारी प्रक्रिया नसते. ती त्यांच्या अनेक वर्षांच्या परिश्रमांची, पालकांच्या त्यागाची आणि भविष्यातील करिअरची कसोटी असते. त्यामुळे अशा प्रकरणांना राजकीय रंग देण्यापेक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यावर सरकारने भर दिला पाहिजे. आजचा तरुण जागरूक आहे. सोशल मीडियामुळे तो सरकारी दाव्यांची पडताळणी करू शकतो. त्यामुळे केवळ आश्वासने नव्हे, तर ठोस कृतीची अपेक्षा विद्यार्थ्यांची आहे.

नव्या शिक्षणमंत्र्यांसमोर सर्वांत मोठे आव्हान मंत्रालय चालवण्याचे नाही, तर विद्यार्थ्यांचा ढासळलेला विश्वास पुन्हा निर्माण करण्याचे आहे. यासाठी राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेचे स्वतंत्र ऑडिट, प्रश्नपत्रिका निर्मितीपासून निकाल प्रक्रियेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता, मजबूत सुरक्षा व्यवस्था आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा उभारणे अत्यावश्यक आहे.

लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. प्रत्येक वेळी आंदोलनानंतरच सरकार जागे होणार असेल, तर प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा एका व्यक्तीच्या पराभवाचा विषय नसून विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा आणि लोकशाहीच्या ताकदीचा संदेश आहे. आता सरकारने राजीनाम्याच्या राजकारणापेक्षा शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत सुधारणांवर भर द्यावा. कारण पुढची परीक्षा मंत्र्यांची नाही, तर संपूर्ण परीक्षा व्यवस्थेची आहे आणि त्या परीक्षेचे खरे परीक्षक देशातील विद्यार्थीच असतील.

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥

ऐसा संताचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पत्रात चोरीचा उल्लेख नाही

## राज ठाकरेंच्या आरोपांना सिद्धीविनायक ट्रस्टचे विश्वस्त सदा सरवणकरांचं प्रत्युत्तर

महाईन्यूज । मुंबई

**महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वर्धापन दिनाच्या मुंबईतील मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी सिद्धीविनायक मंदिराबाबत एक खळबळजनक आरोप केला. 'सिद्धीविनायक मंदिरात दरवर्षी १८ कोटींची चोरी होते', असा दावा राज ठाकरे यांनी केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे एकच खळबळ उडाली. दरम्यान, राज ठाकरेंच्या या आरोपानंतर आता सिद्धीविनायक मंदिर ट्रस्टचे विश्वस्त सदा सरवणकर यांनी प्रतिक्रिया दिली. राज ठाकरे यांनी वाचून दाखवलेल्या पत्रात चोरीचा उल्लेख नाही अशी प्रतिक्रिया सदा सरवणकर यांनी दिली आहे.**



"राज ठाकरेंनी एका सभेत बोलताना सिद्धीविनायक मंदिराबाबत गौरसमजाने काही गोष्टी सांगितल्या. पण सिद्धीविनायक मंदिराचे आमचे जे काही विश्वस्त आहेत, ज्यांनी सरकारला एक पत्र लिहिलं होतं. त्या पत्राच्या माध्यमातून चौकशी करा, अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती. मात्र, हा उल्लेख करताना नागिरकांमध्ये काही गैरसमज निर्माण झाल्याच्या भावना निर्माण झाल्या. पण सिद्धीविनायक मंदिर न्यास अतिशय चांगल्या प्रकारे काम करत आहे", असंही सदा सरवणकर यांनी सांगितलं आहे.

"राज ठाकरेंनी वाचून दाखवलेल्या त्या पत्रामध्ये चोरी असा कुठेही उल्लेख नाही. दोन वर्ष म्हणजे पूर्वी सिद्धीविनायक मंदिर न्यासाची जी काही दानपेटी होती, त्या दानपेटीत येणारी रक्कम साधारण ४० ते ४५ लाख रुपये होती. आता गेल्या महिन्यापासून ही रक्कम ९०, ९५, ९८ लाखांपर्यंत वाढली. त्यासाठी ज्या काही उपाययोजना केल्या, त्यामुळे ही रक्कम वाढली. आता मागील दोन वर्षांचं ऑडिट सरकारकडे जाईल, तेव्हा वाढलेली रक्कम आणि दोन वर्षांपूर्वीची ४० ते ४५ लाख ही रक्कम याचं संपूर्ण ऑडिट होईल, तेव्हा निश्चितच एक संशयाची भावना निर्माण होईल", असं सदा सरवणकर यांनी म्हटलं.

सिद्धीविनायक मंदिरातील दानपेटीतील चोरीबाबत वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मंदिराच्या विश्वस्त मंडळाने दिलेलं एक पत्र राज ठाकरे यांनी वाचून दाखवलं. राज ठाकरे म्हणाले की, "महोदय, आम्ही स्वाक्षरी करणारे सर्व सिद्धीविनायक न्यास मंदिर प्रभादेवी, मुंबई येथील विश्वस्त आहोत. साहेब आमची संबंधित ट्रस्टमध्ये विस्वस्त म्हणून आपण नियुक्ती केली, आपल्या विश्वासाला पात्र राहण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. मंदिराची मिळकत ३५ टक्के जादा वाढवण्यास आम्ही काही प्रमाणात यशस्वी झालो आहोत. महोदय, मंदिराच्या दानपेटीतून पैसे चोरणारे काही कर्मचारी पकडले गेले आहेत. हे कर्मचारी पकडण्यापूर्वी दर बुधवारी दानपेटीतील रकमेची मोजदात ही ५० लाख रुपयांच्या आत होती.

### विश्वस्त सदा सरवणकर काय म्हणाले?

"संशय आला म्हणून विश्वस्तांनी पत्र लिहिलं, हे चांगलं केलं की वाईट केलं? आता ते उत्पन्न ९० लाखांपर्यंत वाढलं आहे. मग चांगलं काम केल्यानंतर तुम्ही शाबासकी देणार की टीका करणार? राज ठाकरे यांनी जे पत्र वाचून दाखवलं, ते अर्धसत्य आहे. कारण आम्ही विविध उपाययोजना केल्यामुळे मंदिराचं उत्पन्न वाढलं. मग वाढलेल्या उत्पन्नाच्या पूर्वीचं जे उत्पन्न होतं, त्याचा ऑडिट रिपोर्ट आलाच पाहिजे, त्याची चौकशी झाली पाहिजे, हे कोण करणार?", असं सदा सरवणकर यांनी म्हटलं.' हे पत्र सिद्धीविनायक मंदिराच्या विश्वस्त मंडळाचं आहे.

# तुकाराम मुंढेंच्या धडक कारवाईविरोधात हॉटेल व्यावसायिक आक्रमक

महाईन्यूज । मुंबई

**राज्यात अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे आल्यापासून अन्नपदार्थ विक्रेते आणि हॉटेल्सविरोधात धडक कारवाई सुरू आहे. या कारवाईविरोधात आता हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यावसायिक आक्रमक झाले आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा त्रुटी दुरुस्त करण्याची संधी न देता थेट परवाने निलंबित अथवा रद्द केले जात आहेत. हा आरोप करत देशातील तीन प्रमुख हॉटेल संघटनांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रकरणात मध्यस्थी करण्याची मागणी केली आहे.**



'हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (वेस्टर्न इंडिया), 'नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया' आणि 'इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन' या संघटनांनी संयुक्तपणे पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या (FSSAI) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना हे निवेदन पाठवले आहे.

कारवाईला विरोध नाही, पण पद्धत चुकीची!

हॉटेल संघटनांनी स्पष्ट केले आहे की, त्यांचा एफडीएच्या कारवाईला किंवा अन्न सुरक्षेच्या नियमांना विरोध नाही. मात्र ज्या पद्धतीने ही कारवाई केली जात आहे, त्यावर त्यांचा आक्षेप आहे.

"अचानक परवाने निलंबित करणे किंवा रद्द करणे ही अत्यंत चिंतेची बाब आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता, चर्चा न करता आणि प्रक्रियेचे पालन न करता केली जाणारी ही कारवाई 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' या संकल्पनेच्या पूर्णपणे विरोधात आहे," असे हॉटेल संघटनांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

तसेच हा उद्योग दरवर्षी सुमारे ३३,८०९ कोटी रुपयांचा महसूल सरकारी तिजोरीत जमा करतो. देशाच्या एकूण जीडीपीमध्ये हॉस्पिटॅलिटी क्षेत्राचा वाटा ५.८ टक्के वाटा असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. एकट्या महाराष्ट्रात देशातील हॉस्पिटॅलिटी बाजाराचा एक तृतीयांश हिस्सा आहे. राज्याच्या 'पर्यटन धोरण २०२४' नुसार या क्षेत्रात १ लाख कोटींची गुंतवणूक आणि ३० लाख नवीन रोजगार निर्मितीचे लक्ष्य आहे.

### हॉटेल संघटनांच्या प्रमुख मागण्या

१) अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या (FSS ACT) कलम ३२ नुसार, कोणत्याही अन्न व्यावसायिकाचा परवाना निलंबित किंवा रद्द करण्यापूर्वी त्याला १४ दिवसांची 'सुधारणा नोटीस' देणे बंधनकारक आहे. या नियमाचे सर्व प्रकरणांमध्ये काटेकोर पालन व्हावे. एफडीएने २३ जून २०२६ रोजी जारी केलेल्या अनुपालन आदेशात मूळ कायद्याशी विसंगत असलेल्या तरतुदी आहेत. भागधारकांशी कोणतीही चर्चा न करता हा आदेश काढण्यात आल्याने त्याचा पुनर्विचार करावा.

हॉटेल संघटनांनी तिसरा चिंतेचा आणि प्रतिष्ठेचा मुद्दा मांडताना म्हटले, कारवाई पूर्ण होण्याआधीच किंवा दोषसिद्धीआधीच हॉटेल्सची नावे, फोटो आणि व्हिडिओ सार्वजनिक केले जात आहेत. यामुळे व्यावसायिकांची न भरून येणारी हानी आणि प्रतिष्ठा मलिन होत आहे.

# 'हनी ट्रॅप'चा कट उधळला!

## पश्चिम बंगाल पोलिसांच्या एसटीएफ पथकाची मोठी कारवाई; महिलेला अटक

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**पश्चिम बंगाल पोलिसांच्या एसटीएफ (विशेष कृती दल) पथकाने एक मोठी कारवाई केली आहे. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित असलेल्या संशयित हमिम मंडल या तरुणाला पोलिसांनी एका निवासी संकुलातून शुक्रवारी अटक केली. हा संशयित तरुण पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय' आणि 'जैश-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. या कारवाईनंतर एसटीएफने आणखी एक मोठा कट उधळून लावला आहे.**



झारखंडच्या साहिबगंजमधून या हमिम मंडलची कथित मैत्रीण अर्पिता सरकार (वय २२) हिला पोलिसांनी अटक केली आहे. अटकेनंतर एसटीएफच्या पथकाने तिला पश्चिम बंगालला नेलं आहे. अर्पिता ही 'हनी-ट्रॅप'च्या नेटवर्कचा मुख्य भाग होती असा संशय पोलिसांना आहे. या माध्यमातून ती पश्चिम बंगालमधील मोठ्या राजकीय नेत्यांना जाळ्यात ओढण्यासाठी आणि त्यांची संवेदनशील वैयक्तिक माहिती गोळा करण्यासाठी हालचाली करत होती, असा संशय एसटीएफला आहे.

मोठ्या राजकीय नेत्यांना जाळ्यात ओढण्यासाठी 'हनी-ट्रॅप'मध्ये अर्पिता ही महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचा आरोप तिच्यावर करण्यात आलेला आहे. या तरुणीची ओळख अर्पिता सरकार अशी पटली असून ती हमिम मंडलच्या नियमित संपर्कात होती अशी माहिती तपासादरम्यान समोर आली आहे. तसेच या दोघांमधील चॅट्स देखील हस्तगत करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. एसटीएफ अधिकाऱ्यांकडून आता या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

दरम्यान, हमिम मंडल या तरुणाने काही प्रभावशाली राजकीय व्यक्तींशी संपर्क साधण्यासाठी आणि त्यांची वैयक्तिक माहिती गोळा करण्याच्या अनुषंगाने या तरुणीचा वापर केला होता असा आरोप आहे. दरम्यान, ही माहिती भविष्यात दहशतवादी हल्ले किंवा इतर देशविरोधी कारवायांना मदत करण्यासाठी वापरली जाणार होती का? याचा तपास आता पोलीस करत आहेत. या प्रकरणातील प्रत्येक पैलूचा सखोल तपास सुरू असून, या कथित हनी-ट्रॅप नेटवर्कमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का आणि त्याचे देशविरोधी कारवायांशी काही संबंध आहेत का, याचा शोध तपास यंत्रणा घेत आहेत.

### एसटीएफच्या अधिकाऱ्यांनी काय सांगितलं?

हनी-ट्रॅपच्या नेटवर्कचा भाग म्हणून काही व्हिआयपी व्यक्तींना जाळ्यात ओढण्यासाठी ही तरुणी मुख्य भूमिका बजावत होती. काही राजकीय व्यक्तींची संवेदनशील आणि वैयक्तिक व गुप्त माहिती मिळवण्यासाठी आरोपीने एक नेटवर्क तयार करण्याचा प्रयत्न केला होता, असं तपासादरम्यान आढळून आल्याची माहिती एसटीएफच्या एका अधिकाऱ्यानी दिली.

---

# इराणचा अमेरिकेला मोठा इशारा; प्रमुख ठिकाणांना टार्गेट

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका-इराणमध्ये पुन्हा एकदा युद्धाचा वणवा पेटला आहे. ८ एप्रिल २०२६ रोजी अमेरिका-इराणमध्ये युद्धविरामाची घोषणा झाली होती. त्यानंतर दोन्ही देशांत शांतता करारासाठी चर्चाही झाल्या. डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी शांतता करारावर स्वाक्षऱ्याही केल्या. मात्र, त्यानंतर शस्त्रसंधी संपुष्टात आल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. त्यामुळे अमेरिका-इराण संघर्ष पुन्हा भडकला आहे.**



### इराणने जाहीर केली यादी

इराणच्या कथित यादीत सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कतार, कुवेत, बहरीन, इस्रायल या देशांतील ऊर्जा प्रकल्प आणि पायाभूत सुविधांच्या ठिकाणांना टार्गेट करण्याचा इशारा देण्यात आल्याचा दावा वृत्तात करण्यात आला आहे. या चर्चेमुळे मध्य पूर्वेतील तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, त्याचे जागतिक ऊर्जा बाजारपेठ आणि सुरक्षेवरही परिणाम होऊ शकतात. इराणभोवती नौदलाची नाकेबंदी कायम ठेवणं आणि अतिरिक्त उपाययोजनांद्वारे आर्थिक दबाव आणखी वाढवणं, शांतता राखण्यासाठी मुत्सद्देगिरी करणं आणि निर्बंध लादणं, मात्र तरीही अपयश आल्यास लष्करी हल्ले पुन्हा सुरू करणं, या पर्यायांबाबत डोनाल्ड ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यात चर्चा झाली.

इराणने काही दिवसांपूर्वी जॉर्डनमधील अमेरिकेच्या हवाई तळावर क्षेपणास्त्र हल्ला केला. या हल्ल्यात अमेरिकेच्या हवाई तळाचं मोठं नुकसान झालं. त्यानंतर अमेरिकेनेही इराणवर भीषण हवाई हल्ले केले. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या ऊर्जा आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांवर हल्ला करण्याचा इशारा दिला. त्यामुळे इराणनेही आक्रमक भूमिका घेत थेट अमेरिकेला मोठा इशारा दिला आहे.

अमेरिकेने हल्ला केल्यास इराणकडून थेट सौदी, यूएई, कतार आणि इस्रायलमधील ऊर्जा प्रकल्पांची यादी जाहीर करत हल्ला करण्याचं टार्गेटच सांगितलं आहे. त्यामुळे मध्य पूर्वेत पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे. या संदर्भातील वृत्त इराणच्या तस्नीम न्यूजने आहे.

वृत्तानुसार, अमेरिका किंवा इस्रायलने जर पुन्हा नव्याने हल्ले केले, तर इराणकडून आता मध्य पूर्वेतील प्रमुख ऊर्जा प्रकल्पांना टार्गेट करण्यासाठी एक सर्वसमावेशक योजना तयार करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, एका अमेरिकी अधिकाऱ्याने 'ॲक्सिऑस'ला सांगितलं की, ट्रम्प इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करण्याचा विचार करत आहेत. पण अद्याप त्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.


'ॲक्सिओस'च्या एका वृत्तानुसार, डोनाल्ड ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यातील चर्चेचा मुख्य विषय इराण युद्ध हाच होता. ट्रम्प आणि नेतान्याहू यांनी इराणबाबत तीन पर्यायांवर चर्चा केली.

पहिला पर्याय म्हणजे इराणबरोबर वाटाघाटींद्वारे करार करणं. या पार्श्वभूमीवर अमेरिकेकडून स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर हे इराणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करत आहेत. मात्र, अद्याप दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात मतभेद आहेत. या वाढत्या तणावामुळे मध्य पूर्वेत व्यापक संघर्ष भडकण्याची भीती व्यक्त केली जात असून, जागतिक ऊर्जा बाजारपेठ आणि कच्च्या तेलाच्या किमतींवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# निया-सिकंदर एकत्र?

टीव्ही अभिनेत्री निया शर्मा तिच्या हॉट आणि बोल्ड अंदाजामुळे नेहमीच चर्चेत असते. मात्र आता निया तिच्या खाजगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. तिने सोशल मीडियावर काही फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ती मालदीवमध्ये दिसली. विशेष म्हणजे तिच्यासोबत सिकंदर सिंग देखील दिसत आहे. या दोघांच्या एकत्र असलेल्या फोटोंमुळे त्यांच्या डेटिंगच्या चर्चांना उधाण आले आहे. निया शर्माचे हे फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. निया शर्माने मालदीवचे अनेक फोटो सोशल मीडियावर शेअर केले. काही फोटोंमध्ये ती मोनोकिनी घालून बीचवर चिल करताना दिसत आहे. तर एका फोटोमध्ये निया शर्मा आणि सिकंदर सिंग एकत्र दिसले. दोघांनी मालदीवमध्ये एकत्र सायकलिंगही केली. तसेच, शेवटच्या फोटोमध्ये निया आणि सिकंदर एकमेकांना पकडून पोज देताना दिसले. नियाचे हे फोटो पाहून लोकांनी त्यांच्या डेटिंगच्या चर्चा सुरू केल्या आहेत. काहींनी या फोटोवर कमेंट करत ‘दोघे एकत्र खूप छान दिसत आहात,’ असे म्हंटले आहे. दरम्यान, या विषयावर निया शर्माने अजून कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.



# ‘वीराना’ सिनेमातील सुंदर आणि बोल्ड भूत

एका चित्रपटाने तिला रातोरात स्टार बनवलं... तिच्या सौंदर्याने लाखो प्रेक्षकांना भुरळ घातली, तर पडद्यावरील चुडैलच्या भूमिकेने अनेकांच्या अंगावर अक्षरशः काटा आणला. पण ज्या अभिनेत्रीच्या नावाची एकेकाळी बॉलिवूडमध्ये जोरदार चर्चा होती, तीच अभिनेत्री अचानक इंडस्ट्रीतून आणि सार्वजनिक आयुष्यातून गायब झाली. तिच्या गायब होण्यामागे अंडरवर्ल्डचा दबाव होता का? ती खरंच भारत सोडून अमेरिकेत स्थायिक झाली का? की तिच्याबाबत पसरलेल्या अफवा सत्य होत्या? ‘वीराना’ चित्रपटातील भुताची भूमिका साकारून घराघरात पोहोचलेल्या ‘जास्मिन धुन्ना’ यांच्या आयुष्याभोवती आजही अनेक रहस्यांचे गूढ कायम आहे. 1988 मध्ये प्रदर्शित झालेला ‘वीराना’ हा हॉरर चित्रपट हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या भयपटांपैकी एक मानला जातो. रामसे बंधूंनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाने त्या काळातील हॉरर सिनेमाला नवी ओळख मिळवून दिली. या चित्रपटातील चुडैलची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री जास्मिन धुन्ना यांनी आपल्या सौंदर्य, प्रभावी अभिनय आणि पडद्यावरील दमदार उपस्थितीमुळे प्रेक्षकांच्या मनावर अमीट छाप सोडली. ‘वीराना’ प्रदर्शित झाल्यानंतर त्या एका रात्रीत लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचल्या. जास्मिन धुन्ना यांनी अवघ्या 13 व्या वर्षी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यांनी ‘सरकारी मेहमान’ या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर काही चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्यानंतर त्यांना ‘वीराना’मधून मोठी ओळख मिळाली.




# डबल सरप्राइजसह परतणार रीचर

ओटीटीच्या जगतात सर्वात चर्चित सीरिजमध्ये हॉलिवूड स्टार एलन रिचसन याच्या ‘रीचर’चा समावेश आहे. आतपर्यंत रीचरचे तीन सीझन आले असून तिन्ही यशस्वी ठरले आहेत. आता निर्मात्यांकडून याच्या चौथ्या सीझनची घोषणा करण्यात आली आहे. याचबरोबर रीचरमधील लोकप्रिय व्यक्तिरेखा अन् स्पाय एजंट ‘नीली’वरून मोठे सरप्राइज देण्यात आले आहे. तिसऱ्या सीझनची कहाणी अत्यंत उत्कंठा वाढविणारी ठरली होती. आता रीचरचा नायक एलन रिचसनने चौथ्या सीझनची घोषणा केल्याने प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. एलनने रीचरचे फर्स्ट लुक पोस्टर शेअर करत 12 ऑगस्ट रोजी चौथ सीझन ओटीटी प्लॅटफॉर्म अमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार असल्याचे स्पष्ट केले. याचबरोबर प्रेक्षकांना यावेळी सीरिजमधील मुख्य व्यक्तिरेखा नीलीचा स्पिन ऑफही पाहता येणार आहे. रीचर वेबसीरिजमध्ये नीलीची भूमिका प्रसिद्ध हॉलिवूड अभिनेत्री मारिया स्टेनने साकारली आहे. अशाप्रकारे रीचरच्या निर्मात्यांनी चाहत्यांना डबल सरप्राइज दिले आहे. रीचर ही सीरिज भारतीय प्रेक्षकांची पसंतीची ठरली आहे. एक स्पाय थ्रिलर म्हणून रीचरने स्वत:च्या सर्व सीझनच्या बळावर प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले आहे.

# भारताचं पुरुषांच्या तिहेरी उडीत दुहेरी यश!

## मैदानावर तिरंगा फडकला, प्रवीण चित्रावेलचं रौप्य, सेल्वा प्रभूचं कांस्य

**महाईन्यूज । ग्लासगो**

**भारतीय ॲथलीट प्रवीण चित्रावेल आणि सेल्वा प्रभू थिरुमारन यांनी कॉमनवेल्थ गेम्स २०२६मधील पुरुषांच्या तिहेरी उडी (ट्रिपल जंप) स्पर्धेत अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक पटकावत भारताला दुहेरी यश मिळवून दिलं. भारताच्या खेळाडूंनी पुन्हा एकदा अजून एका क्रीडा प्रकारात दोन खेळाडूंनी पदकांची कमाई केली.**







प्रवीणने आपल्या चौथ्या प्रयत्नात १६.५८ मीटर अशी सर्वोत्तम उडी मारत रौप्यपदकावर नाव कोरलं, तर सेल्वा प्रभूने १६.५२ मीटरची सर्वोत्तम उडी घेत कांस्यपदकाची कमाई केली. स्पर्धेच्या पहिल्या तीन फेऱ्यांनंतर प्रवीण १६.०५ मीटरच्या पहिल्या प्रयत्नासह पाचव्या स्थानावर होता. त्यानंतर तिसऱ्या फेरीत त्याने १६.३१ मीटरची उडी घेत आपली कामगिरी उंचावली आणि चौथ्या प्रयत्नात १६.५८ मीटरची दमदार उडी मारत काही काळासाठी आघाडीही घेतली.

दुसरीकडे, सेल्वा प्रभू थिरुमारन याने दुसऱ्या प्रयत्नात १६.१७ मीटरची उडी मारत कांस्यपदकाच्या शर्यतीत स्थान मिळवलं. त्यानंतर तिसऱ्या फेरीत त्याने १६.४३ मीटरची उडी घेतली आणि अखेरीस १६.५२ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह कांस्यपदक पटकावलं. या दुहेरी पदकांमुळे ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्स २०२६मधील ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताची दमदार कामगिरी आणखी अधोरेखित झाली.

दरम्यान, यापूर्वी भारतीय बॉक्सर जास्मिन लम्बोरिया हिने महिला ५७ किलो गटाच्या अंतिम सामन्यात विद्यमान विजेती मायकेला वॉल्श हिचा ५-० अशा एकमताच्या निर्णयाने पराभव करत सुवर्णपदक पटकावलं. जयस्मिनच्या या विजयामुळे भारताला त्या दिवशी बॉक्सिंगमधील दुसरं सुवर्णपदक मिळालं. याआधी प्रीती पवार हिने महिला ५४ किलो गटात सुवर्णपदक जिंकत भारताचं खातं उघडलं होतं. जयस्मिनच्या विजयासह ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्समध्ये भारताने बॉक्सिंगमध्ये सलग दुसरं सुवर्णपदकही आपल्या नावावर केलं.

## प्रीती पवार-जास्मिन लम्बोरिया यांची बॉक्सिंगमध्ये ऐतिहासिक सुवर्णपदकं!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अखेर भारताला ज्या ऐतिहासिक सुवर्णपदकांची प्रतीक्षा होती, ती मिळाली! भारताच्या लेकी प्रीती पवार व जास्मिन लम्बोरिया यांनी ग्लासगो येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६मध्ये बॉक्सिंगमध्ये भारताला दोन सुवर्णपदकांची कमाईकरून दिली आहे. आशियाई विजेती असलेल्या प्रीतीने आता कॉमनवेल्थ विजेतेपदाचाही मान पटकावला आहे. अंतिम सामन्यात तिने स्कार्लेट सवाना डेलगाडो हिचा ५-० अशा एकमताने (युनॅनिमस डिसिजन) पराभव करत दमदार शैलीत सुवर्णपदकावर नाव कोरलं.**






विद्यमान विश्वविजेती जयस्मिन लम्बोरिया हिने ग्लासगो येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६मध्ये महिला ५७ किलो गटाच्या अंतिम सामन्यात उत्तर आयर्लंडच्या विद्यमान विजेत्या मायकेला वॉल्श हिचा ५-० अशा एकमताच्या निर्णयाने पराभव करत भारताला बॉक्सिंगमधील दुसरं सुवर्णपदक मिळवून दिलं. विशेष म्हणजे, मागील कॉमनवेल्थ स्पर्धेत जास्मिनने कांस्यपदक जिंकलं होतं, तर यावेळी तिने सुवर्णपदकावर नाव कोरत ऐतिहासिक कामगिरी केली.

भिवानीच्या प्रीती पवारने बॉक्सिंगमधील भारताचे पदकांचे खाते उघडत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकलं आहे. प्रीती पवारने अंतिम सामन्यात सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवलं. महिला ५४ किलो गटाच्या अंतिम लढतीत भारतीय बॉक्सरने स्कार्लेट सवाना डेलगाडो हिच्याविरुद्ध पहिली फेरी पूर्णपणे आपल्या नावावर केली. पंचांच्या ५-० अशा एकमताच्या निर्णयाने प्रीतीने पहिली फेरी जिंकली. पाचही पंचांनी तिला १०-९ असे समान गुण दिले. त्यानंतर सुवर्णपदकासाठी आणखी दोन फेऱ्यांची लढत बाकी होती.

पहिल्या फेरीप्रमाणेच दुसऱ्या फेरीतही प्रीती पवारने पूर्ण वर्चस्व गाजवलं. या फेरीत प्रतिस्पर्धी स्कार्लेट सवाना डेलगाडो हिला एक दंड गुण (पेनल्टी पॉइंट) देण्यात आला, त्यामुळे भारतीय बॉक्सरचं पारडं आणखी जड झालं. दुसऱ्या फेरीनंतरही पाचही पंचांनी २०-१८ अशी गुणसंख्या देत प्रीतीची आघाडी कायम असल्याचं स्पष्ट केलं.

प्रीतीनंतर, जस्मिन लम्बोरियानेही ग्लासगोमध्ये आपल्या बॉक्सिंग कौशल्याची चुणूक दाखवली आणि देशासाठी सुवर्णपदक जिंकलं. महिलांच्या ५७ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात जस्मिन लम्बोरियाने उत्तर आयर्लंडच्या मायकेला वॉल्शचा ५-० असा पराभव करून विजेतेपद पटकावलं. तिने यापूर्वी २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत 'लाइटवेट' गटात भारतासाठी कांस्यपदक जिंकलं होतं; हे तिचं राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील दुसरं पदक ठरलं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। रविवार ।
दि. 02 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

SCAN TO APPLY

B.Sc.
FORENSIC SCIENCES
(Hons.)



Be the Reason Behind the Truth.

A multidisciplinary program that blends science, technology and investigation to analyze evidence, solve crimes and deliver justice.

WHY CHOOSE THIS PROGRAM?

EXPERIMENTAL LEARNING
Hands-on training in modern laboratories, crime scene simulation and case studies.

FUTURE-READY SKILLS
Exposure to DNA Technologies and advanced analytics.

FLEXIBLE CAREER PATHS
Choose between industry internships, research projects or dissertation to become a specialist in your domain.

WHAT YOU WILL LEARN

- Crime Scene Investigation
- Forensic Biology & DNA Analysis
- Forensic Chemistry & Toxicology
- Forensic Psychology
- Cyber Forensics
- Criminology & Criminal Law
- Digital & Computational Forensics

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# भाजप वाहतूक सेलच्या शहर सरचिटणीसपदी सुनील कराळे

## वाहतूक क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध; व्यावसायिकांच्या न्याय्य मागण्यांना प्राधान्य

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारतीय जनता पार्टीच्या वाहतूक सेल आघाडीच्या पिंपरी-चिंचवड शहर सरचिटणीसपदी सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात सक्रिय असलेले सुनील (बाप्पू) सुदामदादा कराळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भोसरीचे आमदार महेशदादा लांडगे आणि पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.**



यावेळी आमदार महेश लांडगे यांनी कराळे यांचे अभिनंदन करत पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. वाहतूक क्षेत्रातील विविध घटकांशी सातत्याने संपर्क ठेवत संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

नियुक्तीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना सुनील (बाप्पू) कराळे म्हणाले, “भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने आणि आमदार महेशदादा लांडगे यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने काम करेन. पिंपरी-चिंचवड शहरातील रिक्षाचालक, टेम्पो-ट्रक व्यावसायिक, अवजड वाहतूकदार आणि वाहतूक क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांच्या न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने आवाज उठवणार आहे. त्यांच्या प्रश्नांचे प्रशासन स्तरावर पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्याबरोबरच भाजपचे संघटन अधिक बळकट करण्यासाठीही कटिबद्ध राहीन.”

सुनील (बाप्पू) कराळे यांच्या नियुक्तीमुळे भाजप वाहतूक सेलला नवसंजीवनी मिळणार असल्याची भावना पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या निवडीबद्दल आमदार महेशदादा लांडगे मित्र परिवार, भाजपचे शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच वाहतूक क्षेत्रातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




“ भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्वाने आणि आमदार महेशदादा लांडगे यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील रिक्षाचालक, टेम्पो-ट्रक व्यावसायिक, अवजड वाहतूकदार तसेच वाहतूक क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांच्या न्याय्य प्रश्नांसाठी सातत्याने लढा देईन. त्यांच्या अडचणी प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवून त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहीन. पक्षाचे संघटन अधिक मजबूत करत सर्वसामान्यांपर्यंत भाजपची विचारधारा पोहोचविण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करेन.

– सुनील (बाप्पू) सुदामदादा कराळे.

# खड्डेमुक्त रस्ते, कोंडीमुक्त वाहतूक अन् कचरा नियोजनासाठी प्रशासनाला “डेडलाईन”

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील रस्ते, वाहतूक, अतिक्रमण, सार्वजनिक वाहतूक, स्वच्छता आणि नागरी सुविधांशी संबंधित प्रश्नांवर सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांच्या तक्रारी वाढल्या आहेत. पावसाळ्यामुळे अनेक ठिकाणी कोंडी निर्माण झालेली आहे. तसेच, मोशीतील कचरा डेपोवर झालेल्या दुर्घटनेनंतर कचरा संकलन नियोजन कोलमडले आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने तात्काळ आणि दीर्घकालीन उपायोजना कराव्यात. यासाठी प्रशासनाला महिनाभराची “डेडलाईन” देण्यात आली आहे.**



भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत भोसरी विधानसभा मतदार संघासह शहरातील नागरी समस्यांबाबत सविस्तर आढावा बैठक घेत प्रशासनाला ठोस आणि कालबद्ध उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी संबंधित विभागांनी संयुक्तपणे काम करत प्रत्यक्ष पाहणी करून अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी क-प्रभाग अध्यक्ष नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, ई-प्रभाग अध्यक्षा अर्चना सस्ते, फ- प्रभाग अध्यक्षा शिवानी नरळे आणि ल- प्रभाग अध्यक्षा रेखा देवकर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, वाहतूक विभागाचे सहायक पोलीस आयुक्त निलेश देशमुख यांच्यासह पोलीस, वाहतूक पोलीस अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील रस्ते आणि पदपथ खड्डेमुक्त करण्यावर विशेष भर देण्यात आला. पदपथ, दुभाजक, चौक आणि सर्कल परिसरातील सर्व खड्डे तातडीने बुजवून व्यापक खड्डेमुक्त मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः प्रत्यक्ष पाहणी करून त्रुटींची नोंद घ्यावी आणि त्यानुसार कामे पूर्ण करावीत, असेही स्पष्ट करण्यात आले. शहरातील बीआरटी मार्ग अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले.

## आवश्यकतेनुसार ‘नो व्हेईकल झोन’...

विकास आराखड्यातील (डीपी) रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणांची संपूर्ण यादी तयार करून नियोजनबद्ध कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. नाशिक फाटा ते दापोडी या मार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी तातडीचा आराखडा तयार करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. पुलांवर आणि मुख्य रस्त्यांवर विनाकारण वाहने उभी करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, नो पार्किंग नियमांची प्रभावी अंमलबजावणी, आवश्यक ठिकाणी दिशादर्शक फलक उभारणे तसेच गरजेनुसार ‘नो व्हेईकल झोन’ आणि जड वाहनांवर निर्बंध लागू करण्याबाबतही चर्चा झाली. दुकानदारांनी स्वतःच्या ग्राहकांसाठी पार्किंगची व्यवस्था करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने पीएमपीएमएल बससेवेत आवश्यक त्या मार्गांवर फेऱ्या वाढविणे, बसथांबे आणि रिक्षा थांबे योग्य ठिकाणी स्थलांतरित करणे, बस वेळेवर धावण्यासाठी नियोजन करणे आणि बसथांब्यावरूनच बसेस सुटतील याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

“ पिंपरी-चिंचवडकरांना सुरक्षित, स्वच्छ, वाहतूक कोंडीमुक्त आणि दर्जेदार नागरी सुविधा मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. रस्ते, पदपथ, अतिक्रमण, पार्किंग, सार्वजनिक वाहतूक आणि स्वच्छता या प्रत्येक विषयावर केवळ बैठका नकोत, तर प्रत्यक्ष कामे दिसली पाहिजेत. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांच्या दैनंदिन अडचणी तातडीने दूर कराव्यात. कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा अथवा दिरंगाई सहन केली जाणार नाही, अशी सक्त सूचना केली आहे.



- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# डेटिंग ॲपची ओळख ठरली महागात

## पिंपळे गुरवमध्ये कारमध्ये डांबून मारहाण; २ लाखांचा ऐवज लुटला

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डेटिंग ॲपवर झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत एका २६ वर्षीय तरुणाला भेटण्यासाठी बोलावून कारमध्ये डांबून ठेवत बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना पिंपळे गुरव येथे घडली. आरोपींनी तरुणाच्या मोबाईलमधून जबरदस्तीने ५० हजार रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करून घेतले. तसेच त्याच्या गळ्यातील सुमारे दीड लाख रुपये किमतीची सोन्याची चेन हिसकावून नेली. या प्रकरणी सांगवी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे.**






ही घटना गुरुवारी (दि. ३० जुलै) दुपारी चार ते सायंकाळी सहाच्या दरम्यान रामकृष्ण मंगल कार्यालयाजवळील पेरूच्या बागेलगत असलेल्या चारचाकी पार्किंग परिसरात घडली. याप्रकरणी २६ वर्षीय तरुणाने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीची डेटिंग ॲपच्या माध्यमातून सौरभ कलकुटकी याच्याशी ओळख झाली होती. त्यानंतर आरोपीने फोन करण्याच्या बहाण्याने फिर्यादीला पिंपळे गुरव येथील रामकृष्ण मंगल कार्यालयाजवळ बोलावले. तेथे फिर्यादीला एका काळ्या रंगाच्या कारमध्ये बसवण्यात आले.

आरोपी सौरभ कलकुटकी आणि पवन पाटील यांनी फिर्यादीला कारमध्ये डांबून विविध ठिकाणी फिरवले. यादरम्यान त्याला हाताने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. त्यानंतर फिर्यादीच्या मोबाईलमधील HDFC बँकेच्या ॲपद्वारे एका व्यक्तीच्या स्कॅनरवर ५० हजार रुपये जबरदस्तीने ट्रान्सफर करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

तसेच फिर्यादीच्या गळ्यातील सुमारे १८ ग्रॅम वजनाची आणि दीड लाख रुपये किमतीची सोन्याची चेन हिसकावून घेण्यात आली. आरोपींनी एकूण दोन लाख रुपयांचा ऐवज लुटल्याचे पोलिसांनी नोंदवले आहे.

याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात बीएनएसच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भालेराव करीत आहेत.



## छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरवाने महादेव नलावडे सन्मानित

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

राष्ट्र विकास, समाजसेवा आणि शिवकार्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल महादेव कृष्णा नलावडे (मराठा सेवक) यांना 'छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

स्वराज्य प्रतिष्ठान (रजि.) व सुतामा बाबू गेणू स्मारक समिती (नियोजित) यांच्या संयुक्त विद्यमाने, शिवराज्याभिषेक गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते श्री. नलावडे यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

समाजहित, राष्ट्र विकास आणि शिवकार्याची प्रेरणा जपणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये श्री. महादेव नलावडे यांनी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजसेवक, शिवप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर श्री. नलावडे यांनी हा सन्मान समाजसेवेची जबाबदारी अधिक वाढविणारा असून, भविष्यातही समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेची कामे विहित मुदतीत पूर्ण करा; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेंतर्गत करण्यात येत असलेली कामे विहित मुदतीत पूर्ण करा, असे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत.**



पिंपरी चिंचवड शहराची वाढती पाण्याची मागणी लक्षात घेता भामा आसखेड धरणातून ६०.७९ द. ल. घ. मी. (१६७ द. ल. लि. प्रतिदिन) इतका पाणी कोटा आरक्षणास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे. त्याअंतर्गत भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याकरिता चालू असलेल्या विविध प्रकल्पास आज आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी भेट दिली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता दिपक पाटील, उपअभियंता दिनेश फाटक, कनिष्ठ अभियंता स्वप्नील पाटील यांच्यासह संबंधित कामांचे ठेकेदार व सल्लागार उपस्थित होते.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेंतर्गत चालू असलेल्या भामा आसखेड धरण ते नवलाख उंबरे येथील बी.पी.टी.पर्यंतच्या १७०० मि.मी. व्यासाची उदंचन नलिका टाकणे, नवलाख उंबरे येथील बी.पी.टी. ते देहूपर्यंत १४०० मि.मी. व्यासाची गुरुत्व नलिका टाकणे तसेच भामा आसखेड धरण येथील जॅकवेल बांधणे या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष धरणाच्या पाण्याखालील १०० फूट खोल बोगद्याची (Intake Tunnel) पाहणी केली. तसेच या सर्व कामांचा आढावा घेऊन उर्वरित कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकारी, कामाचे सल्लागार व ठेकेदार यांना सूचना दिल्या.

> पिंपरी चिंचवड शहराची भविष्यातील पाणी गरज लक्षात घेऊन भामा आसखेड पाणीपुरवठा योजना अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेतील सर्व कामांमध्ये गुणवत्ता आणि सुरक्षिततेची कोणतीही तडजोड न करता उर्वरित कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. शहराला नियोजित वेळेत या योजनेचा लाभ उपलब्ध होईल, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
>
> – डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त.

# चिंचवडच्या ‘त्या’ हैवानाला अखेर धडा!

## अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न; आरोपीला १० वर्षे सक्तमजुरी

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपीला विशेष पोक्सो न्यायालयाने दोषी ठरवत १० वर्षे सक्तमजुरी आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. मोहन चिनप्पा उर्फ केंचप्पा कुऱ्हाडे (वय ३३, व्यवसाय मजूर, रा. अजंठानगर, चिंचवड) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.**






निगडी पोलीस ठाण्यात २०२० मध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीविरुद्ध तत्कालीन भारतीय दंड विधानातील कलम ३७६ सह ५११, ३५४ (ब), ३२३, ५०६ तसेच पोक्सो कायद्यातील कलम ४ सह १८, ७, ८, ११ आणि १२ अंतर्गत कारवाई करण्यात आली होती.

या प्रकरणाची सुनावणी विशेष (पोक्सो) न्यायालयात झाली. विशेष न्यायाधीश संध्या नायर यांनी २८ जुलै २०२६ रोजी निकाल देत आरोपीला दोषी ठरवले. न्यायालयाने त्याला १० वर्षे सक्तमजुरीसह २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला.

अल्पवयीन पीडितेवरील लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न झाल्यानंतर निगडी पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. तपासादरम्यान पीडितेचा जबाब, साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय पुरावे, घटनास्थळ पंचनामा आणि अन्य दस्तऐवजी पुरावे गोळा करून न्यायालयासमोर सादर करण्यात आले.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन महिला पोलीस उपनिरीक्षक व्ही. व्ही. घाटे यांनी केला. विशेष सरकारी अभियोक्ता पी. एस. अग्रवाल यांनी शासनाच्या वतीने युक्तिवाद केला. पैरवी अधिकारी म्हणून ग्रेड पोलीस उपनिरीक्षक गोविंद मरभळ आणि पोलीस शिपाई अनिल जगताप यांनी काम पाहिले.

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त (प्रादेशिक विभाग) बसवराज तेली, पोलीस उपायुक्त संदीप आटोळे आणि सहायक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अर्जुन घोडेपाटील आणि सहायक पोलीस निरीक्षक राहुल गांधे यांनी या प्रकरणातील न्यायालयीन कामकाज पाहिले.

महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या घटना निदर्शनास आल्यास नागरिकांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड पोलिसांनी केले आहे.

## डी.एस.के. कुंजबन सोसायटीच्या विधी सल्लागारपदी ॲड. मंगेश खराबे यांची नियुक्ती

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पुनावळे येथील डी.एस.के. कुंजबन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विधी सल्लागारपदी प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. मंगेश खराबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोसायटीच्या कायदेशीर कामकाजात अधिक पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नियमबद्धता आणण्याच्या उद्देशाने व्यवस्थापन समितीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. संस्थेचे अध्यक्ष अधिकराव दिवे-पाटील यांच्या हस्ते ॲड. खराबे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव निलेश काळे तसेच व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.**



यावेळी बोलताना अध्यक्ष अधिकराव दिवे-पाटील यांनी सांगितले की, “सहकारी गृहनिर्माण संस्थांचे कामकाज दिवसेंदिवस अधिक जटिल होत आहे. पुनर्विकास, सहकार कायदे, करार, सभांचे नियोजन, दस्तऐवजीकरण तसेच विविध कायदेशीर बाबींमध्ये योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. ॲड. मंगेश खराबे यांचा अनुभव आणि कायद्यावरील प्रभुत्व सोसायटीच्या कामकाजासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेचे प्रशासन अधिक सक्षम आणि नियमबद्ध होईल, असा आम्हाला विश्वास आहे.”

सचिव निलेश काळे यांनी सांगितले की, “सभासदांच्या हिताचे संरक्षण, कायदेशीर विषयांवर वेळेवर सल्ला आणि संस्थेचे कामकाज कायद्याच्या चौकटीत राहून अधिक परिणामकारकपणे करण्यासाठी अनुभवी विधी सल्लागाराची आवश्यकता होती. ॲड. मंगेश खराबे यांच्या नियुक्तीमुळे सोसायटीला निश्चितच मोठा लाभ होईल.”

ॲड. मंगेश खराबे हे विधी क्षेत्रातील अभ्यासू, युवा आणि अनुभवी वकील म्हणून ओळखले जातात. त्यांनी एलएल.एम. पदवीत विशेष प्राविण्य मिळविले असून एलएल.बी. आणि वाणिज्य शाखेतील शिक्षणही प्रथम श्रेणीत पूर्ण केले आहे. यावेळी सोसायटीच्या सर्व व्यवस्थापन समिती सदस्यांनी ॲड. मंगेश खराबे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सभासदांच्या हिताचे संरक्षण, संस्थेचे कायदेशीर सक्षमीकरण आणि पारदर्शक प्रशासन यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाचा निश्चितच लाभ होईल, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

### ॲड. मंगेश खराबे यांचे कार्य..

विधी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे त्यांनी विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय मूट कोर्ट स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला असून अनेक पुरस्कारही मिळविले आहेत. तसेच ते पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनचे सदस्य असून धामवीर संभाजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे विधी सल्लागार म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. मुख्यमंत्री यांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत नवीन फौजदारी कायद्यांबाबत पिंपरी-चिंचवड शहरासह परिसरातील हजाराहून अधिक पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. याशिवाय सायबर कायदा, महिला हक्क, पर्यायी वाद निराकरण (ADR), वाहतूक सुरक्षा तसेच विविध कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमांमध्ये ते नियमित मार्गदर्शक, व्याख्याते आणि संसाधन व्यक्ती म्हणून कार्यरत आहेत. तसेच, विविध नामांकित विधी महाविद्यालयांमध्ये मूट कोर्ट, वादविवाद स्पर्धा आणि क्लायंट काऊन्सेलिंग स्पर्धांसाठी परीक्षक म्हणूनही त्यांनी योगदान दिले आहे. कायद्याविषयी जनजागृती आणि सामाजिक प्रबोधनासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले असून त्यांचा अनुभव डी.एस.के. कुंजबन सोसायटीच्या कायदेशीर कामकाजासाठी मोलाचा ठरणार असल्याचा विश्वास व्यवस्थापन समितीने व्यक्त केला.